बेकायदेशीर बांधकामांना संरक्षण न देणेबाबतची प्रचलीत पद्धत प्रभावीपणे राबविण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्र. विकाक-१०९५/प्र. क्र. ७९५/झोपनि-२
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १३ मार्च, १९९६.

पहा :- शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्र. एस. सी. एस्. २८८३/५९४/का. ८ दिनांक २७ जानेवारी, १९८९.

परिपत्रक

अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी करावयाच्या उपाय योजनेबाबत वरील शासन निर्णयाद्वारे यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत. उक्त आदेशानुसार शासकिय/निमशासकिय विभागाच्या मोकळया जमिनीचे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे या पासून संरक्षण करण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधित विभागाची असून त्यासाठी संबंधित विभागाने जरुर ती संरक्षणात्मक कारवाई करावयाची आहे. शासकिय जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याच्या दृष्टीने सिक्युरिटी गार्डस् नेमणे, जमिनीस कुंपन घालणे व वॉचमन नेमणे इ. पद्धत अंमलात आणण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. या प्रक्रियेनंतरही अतिक्रमणे /अनधिकृत बांधकामे उभी राहिली तर गलिच्छ वस्ती नियंत्रक व अतिरिक्त जिल्हाधिकारी (अति.) बृहन्मुंबई, आयुक्त, म. न. पा. यांचे कार्यबल यांनी निष्कासनाची कार्यवाही करणे जरुरीचे आहे. बृहन्मुंबई व्यतिरिक्त इतर नागरी क्षेत्रात निष्कासनाची कार्यवाही ही संबंधित जिल्हाधिकारी व महानगर पालिका आयुक्त/ मुख्य अधिकारी यांनी करावयाची आहे. तथापि, संबंधित विभागाकडून त्यांच्या अधिपत्याखालील जमिनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी काटेकोरपणे पाळली जात नाही. परिणामी शासनाच्या तसेच निमशासकिय मालकीच्या मौल्यवान जमिनीवर अनधिकृत बांधकामाचे/झोपडयाचे अतिक्रमण झाले असल्याचे/होत असल्याचे शासनास निदर्शनास आले आहे. अनधिकृत झोपडयांची बांधकामांची निष्कासनाची कार्यवाही झाल्यानंतरही केवळ जमिनीचे संरक्षण करण्याबाबत योग्य ती दक्षता न घेतल्यामुळे पुन्हा पुन्हा अतिक्रमणे झाल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहेत. तेव्हा अनधिकृत बांधकामे/झोपडया शासकिय / निमशासकिय जमिनीवर होऊ नयेत, म्हणून संबंधीत विभागाने / संघटनेने त्यांच्या अधिपत्याखालील जमिनीचे संरक्षण शासनाने ठरवून दिलेल्या प्रचलीत पद्धतीनुसार करण्याची दक्षता घ्यावी व तशा सूचना संबंधीताना द्याव्यात. ह्या प्रकरणी

. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(आय. एम्. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन